महाराष्ट्राचा मानबिंदू
लोकमत
पृष्ठे : २८ (१२+८+CNX/८) किंमत : ₹ ४.००
पुणे, बुधवार, दि. १ जुलै २०१५

सिटी इंटरनॅशनल स्कूल : अनाथाश्रमाला पंख्यांची भेट

# विद्यार्थ्यांचे खाऊच्या पैशातून समाजकार्य

**पुणे :** रोजचे खाऊचे पैसे एकत्र करुन सिटी इंटरनॅशनल स्कूलमधील विद्यार्थ्यांनी ज्येष्ठ समाजसेविका सिंधूताई सपकाळ यांच्या अनाथाश्रमाला १२ पंखे भेट दिले. तसेच तेथील मुलांना खाऊचे वाटपही करण्यात आले.

सिटी इंटरनॅशनल ग्रुप ऑफ स्कूलचे अध्यक्ष मौलिक दीक्षित यांच्या मार्गदर्शनाखाली औंध येथील शाळेने चॅरिटी क्लबची स्थापना केली आहे. या क्लबअंतर्गत विविध सामाजिक उपक्रम राबविली जातात. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी नुकतीच सिंधूताई सपकाळ यांच्या मांजरी येथील अनाथाश्रमाला भेट दिली. त्यांनी जमा केलेल्या निधीतून १२ पंखे व तेथील विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप केले. यामध्ये शाळेतील सर्व विद्यार्थ्यांसह शिक्षकही सहभागी झाले होते. या वेळी विद्यार्थ्यांनी सिंधूताईंशी संवाद साधला. या वेळी त्यांच्या मार्गदर्शनाने विद्यार्थीही भारावून गेले.


सिटी इंटरनॅशनल स्कूलमधील विद्यार्थिनी सिंधुताई सपकाळ यांच्यासमवेत.

चॅरिटी क्लब अंतर्गत विद्यार्थ्यांनी इंडियन असोसिएशन फॉर कॅन्सर या संस्थेलाही भेट देण्यात आली. अलीकडच्या पिढीला समाजात चांगले कार्य करणाऱ्या संस्थांची ओळख करुन देण्याची जबाबदारी शाळांची आहे. या जाणिवेतूनच शाळेमार्फत हे उपक्रम राबविण्यात आले. यापुढेही शाळेमार्फत असे उपक्रम घेण्यात येणार आहेत. (प्रतिनिधी)